महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०० वा | दिनांक : १४/०१/२०२५ | वार : मंगळवार

## भाजपमध्ये सगळे दगाबाजी करून मंत्री झाले : संजय राऊत



**मुंबई :** शिर्डी येथे भाजपचे अधिवेशन पार पडले, यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाषण केले. भाषणातून अमित शहा यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. तसेच शरद पवार यांनी दगाबाजीचे राजकारण केले असल्याचा आरोप अमित शहा यांनी केला होता. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पलटवार केला आहे. अमित शहा यांनी जरा रिसर्च करणे गरजेचे असल्याची टीका संजय राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले, अमित शहा यांनी थोडे रिसर्च करणे गरजेचे आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांचे राजकारणाच्या पलीकडे कसे संबंध होते याची जरा त्यांनी माहिती घेतली पाहिजे. त्यांनी शिर्डीत भाषण केले, भाषण कशावर केले तर दगाबाजीवर. त्यांच्या व्यासपीठावर जे बावीस लोक होते ते लोक दगाबाजी करून तिकडे जाऊन बसलेले होते. अमित शहा दगाबाजीवर बोलतात म्हणजे कमाल आहे. भाजपमध्ये सगळे दगाबाजी करून मंत्री झाले आहेत. बीडमध्ये जे घडत आहे त्यावर अमित शहा यांनी बोलायला पाहिजे. आमच्यावर टीका करत बसण्यापेक्षा तिकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

अमित शहा म्हणाले, आज महाराष्ट्रातील महाविजयानंतर आपण सगळे एकत्र आलो आहोत. तुम्हाला माहीत नाही की तुम्ही किती मोठे कार्य केले आहे. देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले. आपले सोबतचे घटक पक्ष खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादीला देखील मोठे यश मिळाले. शरद पवारांनी जे धोकेबाजीचे राजकारण सुरू केले होते त्याला २० फुट खाली जमिनीत आपण गाडून टाकले आहे. उद्धव ठाकरेंनी आपल्यासोबतचे द्रोह केले होते, २०१९ ला विचारधारा सोडली, बाळासाहेबांची विचारधारा सोडली, अशा उद्धव ठाकरे यांना आपण सर्वांनी मिळून त्यांची जागा दाखवून दिली आहे. २०२४ पर्यंत महाराष्ट्र अस्थिर होते, त्याला स्थिर करण्याचे कार्य तुम्ही सर्वांनी मिळून मजबूत देवेंद्र फडणवीस सरकार आणून केले आहे.

## प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांचा थायलंड येथे साहित्यरत्न पुरस्काराने गौरव



**छत्रपती संभाजीनगर :** थायलंड येथील बँकॉक शहरात झालेल्या फुले-शाहू- आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनात प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद, इंडियन असोसिएशन पटाया, थायलंड आणि सोनवणे फाउंडेशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने थायलंडची राजधानी बँकॉक येथे पहिले फुले-शाहू-आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाचे आयोजन ७ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले होते.

या संमेलनात विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला, त्यात प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांना फुले- शाहू-आंबेडकर साहित्यरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. प्राचार्य डॉ. हसन इनामदार हे मूळचे केसर जवळगा, ता. उमरगा जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथील रहिवासी असून सध्या औरंगाबाद येथे स्थायिक आहेत. प्राचार्य इनामदार हे मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

तसेच डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय औरंगाबाद, मातोश्री कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज औरंगाबाद, डॉ. योगेश भैया शांतीलालजी देसरडा चॅरिटी हॉस्पिटल औरंगाबाद, मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज शेलगाव, ता. बदनापूर जि. जालना आणि मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा कौशल्य विकास संस्था, शेलगाव, ता. बदनापूर जि. जालना या संस्थांचे संस्थापक अध्यक्ष आहेत आणि दै. महाराष्ट्र जनशक्ती व एम.जे. न्युज चॅनलचे मुख्य संपादक आहेत.

प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांच्या या यशाबद्दल डॉ. कांचन देसरडा मॅडम, डॉ. योगेश देसरडा, डॉ. कोमल देसरडा, डॉ. रश्मी अभय कुचेरिया, डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. ऋषिकेश कांबळे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेते राजेश मुंढे, उद्योगती राजेश उघडे, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. अरुण कोळी, डॉ. किशोर सूर्यवंशी, डॉ. तुकाराम सराफ, डॉ. धनंजय वडमारे, डॉ. प्रशांत कुमार वनंजे, डॉ. शंकर वाघमारे, सोनवणे फाउंडेशन नाशिकचे बापूसाहेब सोनवणे, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. मिलिंद वाव्हळे, प्रा. सय्यद शबाना शब्बीर, साहिल कॉम्प्युटर्सचे संचालक इरफान इनामदार यांच्या सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## शालेय शिक्षणात महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शालेय शिक्षणात महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत बोलताना शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत, असे निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यावेळी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने 100 दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.

या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये शिकविण्यावर भर द्यावा. शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना घडविणारे उत्कृष्ट शिक्षक ही मोठी संपत्ती आहे, त्यांचा इतरांसाठी आदर्श म्हणून उपयोग करा, अशा सूचना फडणवीस यांनी दिले आहेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पूर्व प्राथमिक शिक्षणाची नोंदणी करून त्यांना कमीत कमी कोणत्या बाबी आवश्यक असाव्यात हे सांगून त्यांना प्रमाणपत्र द्या, पालकांचा विश्वास रहावा यासाठी हे प्रमाणपत्र त्यांनी दर्शनी भागात लावण्याची अट असावी. समूह शाळा ही अतिशय महत्त्वपूर्ण आणि आवश्यक बाब आहे. तथापि, कमी संख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना समूह शाळांमुळे होणारे लाभ योग्य प्रकारे समजावून सांगा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचे देखील यावेळी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. सर्व मान्यवरांनी आपल्या भागातील एक शाळा दत्तक घेऊन त्या शाळेच्या उन्नतीसाठी नियमित भेट द्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांचे आधार लिंक लवकर पूर्ण करावे तसेच शाळांच्या विकासासाठी समग्र शिक्षाच्या निधीचा वापर करावा, अशी सूचना केली. राज्यगीत सर्व शाळांमध्ये सक्तीचे तसेच मराठी भाषेची प्रभावी अंमलबजावणी करणार. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील संरचना लागू करण्यासाठी सर्व शाळा/अंगणवाडी केंद्रांचे जिओ टॅगिंग करून छायाचित्रांसह मॅप करणार. राज्य अभ्यासक्रम आराखडा 2025-26 पासून लागू करणार. पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर प्रत्येक क्लस्टरमधून एका शाळेचा सीएम श्री शाळा म्हणून विकास करणार. सर्व विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकांची वैधता तपासणार. शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करून बळकटीकरण करणार, अशा घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ जानेवारी २०२५

## वाचन हीच विद्यार्थ्यांच्या यशाची गुरुकिल्ली..... प्रा. डॉ. महेश मोटे




मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाप्रसंगी डॉ. महेश मोटे बोलताना अशोक सपाटे, करबसप्पा ब्याळे, सुशील मठपती व अन्य.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तंत्रज्ञानाच्या काळात युवा पिढी मोबाईलच्या अति आहारी गेली आहे. या अतिरेकी वापरामुळे वाचनाकडे दुर्लक्ष झाले आहे. अलीकडे समाजमाध्यमांवर युवा पिढी मोठ्या प्रमाणात भरकटली जात आहे. या युवा पिढीला वाचनाची आवड निर्माण व्हावी.

वाचन म्हणजे मनाची मशागत, वाचनाने मस्तक समृद्ध बनते, समृद्ध झालेले मस्तक तरुणांचे व्यक्तिमत्व घडवते त्यामुळे वाचन हीच विद्यार्थ्यांच्या यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले.

माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात ग्रंथालय विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा व शाळा संपर्क अभियान (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : २०२०) अंतर्गत व्याख्यानाप्रसंगी सोमवारी (ता. १३) रोजी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य करबसप्पा ब्याळे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समन्वयक प्रा. डॉ. सुशील मठपती, प्रा. डॉ. सुजित मटकरी, ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्टे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महेश मोटे म्हणाले की, विद्यार्थ्यांना क्रमिक अभ्यासक्रमासोबत अवांतर वाचन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने आनंददायी वाचन चळवळ सुरू करण्याचा उद्देशाने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, भाषा कौशल्यांचा विकास, तर्कशक्ती व सर्जनशीलता वाढविणे, तणावमुक्त शिक्षण, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची जोपासना आदी उद्देश डोळ्यासमोर ठेवून या उपक्रमाचे महाराष्ट्रभर आयोजन करण्यात येत असल्याचे शेवटी ते म्हणाले.

प्रा. डॉ. सुशील मठपती म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुण, तंत्र कौशल्यांच्या विकासासोबतच त्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमाची रचना करण्यात आलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना विषय निवडण्याचे स्वातंत्र्य, स्वायत्तता, आनंददायी शिक्षण व स्वतःच्या आवडीनिवडीनुसार शिक्षण घेण्याची मुभा देण्यात आली आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधला जाणार आहे. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. अशोक सपाटे की, विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून अवांतर वाचनाचा संकल्प करावा. नितीन कंटेकुरे, विजयालक्ष्मी भालेराव, प्रा. अजिंक्य राठोड आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुजित मटकरी यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमास विविध शाखेचे बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## बीड प्रकरणातील एकही आरोपी सुटता कामा नये : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे एसपी आणि सीआयडी अधिकाऱ्यांना फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे. एकही आरोपी सुटता कामा नये अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत. तसेच कुठलीही दयामाया कोणाला दाखवू नका, असेही देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. धनंजय देशमुख यांच्या टाकीवर चढून केलेल्या आंदोलनानंतर देवेंद्र फडणवीस यांनी बीडच्या एसपींशी संपर्क केला असल्याचे बोलले जात आहे.

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर महाराष्ट्रातील वातावरण संपूर्णपणे ढवळून निघाले आहे. त्यात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. आरोपींना काठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडच्या एसपी आणि सीआयडी अधिकाऱ्यांशी संपर्क करत एकही आरोपी सुटता कामा नये तसेच कोणावरही दयामाया दाखवू नका, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, संतोष देशमुख हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील मुख्य आरोपी विष्णू चाटे याला आज केज न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने विष्णू चाटेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी केज न्यायालयाने विष्णू चाटेची दोन दिवसांच्या सीआयडी कोठडीत रवानगी केली होती. त्याची सीआयडी कोठडी संपल्याने त्याला आज केज कोर्टात हजर करण्यात आले होते. आता त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

तसेच धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय मानला जाणारा वाल्मीक कराडवरही खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. सध्या तो पोलिस कोठडीत असून त्याची कोठडी उद्या संपणार आहे. त्यामुळे उद्या दुपारी त्याला केज न्यायालयात हजर केले जाईल. वाल्मीक कराडला पुन्हा किती दिवसांची कोठडी मिळते, हे पहावे लागणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## राजकारणात आज शत्रू असणारा उद्या मित्र होतो : अमृता फडणवीस

**मुंबई :** अलिकडच्या काही दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची भाजपसोबत जवळीक वाढली आहे. यावरून मिसेस मुख्यमंत्री अमृता फडणवीस यांनी भाष्य केले. नेत्यांमध्ये विचाराधारांबाबत मतभेद आहेत.

त्यामुळे एकेकाळचा शत्रू हा मित्र होतो, मग परत शत्रू होते, अशी कितीतरी उदाहरणे असल्याचे अमृता फडणवीस म्हणाल्या. यावेळी त्यांनी शरद पवारांनी संघाच्या कामाबद्दल केलेल्या कौतुकावर प्रतिक्रिया दिली.

राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून भाजप आणि ठाकरे गटाची जवळीक वाढत असल्याचे दिसून येत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना अमृता फडणवीसांनी सूचक विधान केले.

उद्धव ठाकरे यांची भूमिका बदलत आहे का? असा सवाल अमृता फडणवीस यांना विचारला असता, नेत्यांमध्ये असणारे मतभेद हे विचारधारांबाबत आहेत. त्यांच्या वैयक्तिक पातळीवर ते मतभेद नाहीत.

वैचारिक मतभेद असल्याने राजकारणात एकेकाळचा शत्रू असणारा हा मित्र होतो, मग परत शत्रू होतो, परत मित्र होतो अशी कितीतरी उदाहरणे आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

पुढे बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, देवेंद्र फडणवीस किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सगळे प्रगतीचे राजकारण करतात, असे मला वाटते. जातीय राजकारण आपण आणतो, आपण ते करायला नको. लोकांच्या हातात ही बाब आहे, माध्यमांच्या हातात आहे.

अमृता फडणवीस यांनी शरद पवार यांनी संघाच्या कामाच्या केलेल्या कौतुकावरही आपले मत मांडले. शरद पवार हे दिग्गज नेते आहेत. त्यांचे विश्लेषण खूप चांगले असते. आरएसएस बाबत ते जे बोलले ते चांगलेच विश्लेषण त्यांनी केले. त्याबद्दल मला त्याचा आनंद असल्याचे त्यांनी म्हटले.

दरम्यान, ठाकरे-फडणवीसांच्या भेटीगाठीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. सरडे रंग बदलतात, पण एवढ्या वेगाने रंग बदलणारे मी पाहिले नाहीत, असे ते म्हणाले. मी मुख्यमंत्री असताना मला शिव्या शाप आणि आरोप करण्याशिवाय त्यांनी दुसरे काही केले नाही. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना त्यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन आरोप केले.

त्यांना तुरुंगात टाकण्याचे कारस्थान केले. तू राहशील नाही तर मी राहीन, अशी भाषा वापरली. पण आता पाहा काय बदल झाला? काय जादू झाली? असा खोचक सवालही शिंदे यांनी केला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ जानेवारी २०२५


## कन्नड कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ बर्खास्त करा : स्वाभिमानी शेतकरी संघटना



कन्नड(अरुण थोरात): कन्नड कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यकारी संचालक मंडळ बर्खास्त करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हा उपनिबंधक छ.संभाजीनगर यांना दि.१३ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनात केली आहे.बाजार समिती चा कारभार गेल्या काही महिन्यां पासून ऐन केन कारणांनी चव्हाट्यावर आला आहे.

मका शेतकऱ्याला व्यापाऱ्याने केलेली आरेरावी, किंवा नुकतेच एका संचालकाला मारहाण झाल्याची घटना यामुळे बाजार समीती शेतकऱ्यांसाठी की व्यापार्यांसाठी याची चर्चा तालुक्यात सुरु आहे. आता समितीचे संचालक मंडळच बर्खास्त करण्याची मागणी स्वा.शे.संघटनेने केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, कन्नड कृषी उत्पन्न बाजार समीतीची कन्नड शहरात मध्यभागी, संस्थेच्या मालकीची जमीन क्र. ७/४ गटातील २९ गुंठे असलेली चार गोडावून सह जमीन संचालक मंडळास विश्वासात न घेता परस्पर रजिस्ट्री, भाडेपट्टी वर एक जवळच्या मर्जीतील संचालकाच्या नातेवाईकाच्या नावे करण्यासाठी रजिस्ट्री कार्यालयात दाखल केले असता. एका संचालकाने ही प्रक्रिया रोखली.

तेंव्हा सभापती व संचालकाने तेथून पळ काढला. याप्रकरणी बाजार समिती सचिव कुणाल कदम यांनी या कामास विरोध दाखवून पदाचा राजीनामा दिला. याप्रकरणी सभापती व ईतर संचालकांनी, संचालक शेख युनूस यांना या प्रकरणाला विरोध केला म्हणून शिवगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. तरी शेख युनूस यांना पोलीस संरक्षण देणे बाबत पोलीस स्टेशन ला कळविण्यात यावे. कृषी उत्पन्न बाजार समितीत चाललेला गोंधळ थांबविण्यासाठी तात्काळ संचालक मंडळ बर्खास्त करण्यात यावे. आठ दिवसांत प्रशासक नेमण्यात यावा.

तसेच बाजार समिती संपूर्ण क्षेत्राची शासकीय मोजणी करुण अतिक्रमण हटवावे. समितीने केलेले भाडे करार याचे ऑडीट करुण अहवाल सादर करावा, बाजार समिती जमीनीचे संरक्षण करावे.

अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना आपल्या कार्यालया समोर दि. २५ जानेवारी नंतर आगळेवेगळे आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृषीभुषण भाऊसाहेब थोरात, जेष्ठ नेते दिनकर पवार, जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, विलास मेणे, तालुका संघटनाध्यक्ष प्रकाश बोरसे, पक्ष तालुकाध्यक्ष रामेश्वर भुसारे यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

## राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त काँग्रेसचे राज्यव्यापी अभियान

**मुंबई** - भाजपाकडून संविधान व संविधान निर्मात्याचा सात्यत्याने अवमान केला जात असताना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान, राज्यघटना, सामाजिक न्याय व समानतेच्या मुल्यांचे रक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष कट्टीबद्ध आहे. याच हेतूने काँग्रेस पक्षाने ‘जय बापू, जय भीम, जय संविधान’ हे अभियान आयोजित केले आहे.

देशपातळीवर ३ जानेवारीपासून हे अभियान सुरु झाले असून २६ जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, महू येथे एक भव्य रॅलीने त्याची सांगता होणार आहे.

राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापनदिनी २६ जानेवारी २०२५ रोजी ‘जय बापू, जय भीम, जय संविधान’ रॅलीचे राज्य, जिल्हा व ब्लॉक स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. हे अभियान अधिक मजबूत करण्यासाठी २६ जानेवारी २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या दरम्यान ‘संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा’ ही देशव्यापी जनसंपर्क मोहिम सुरु केली जाणार आहे.

या अभियानात प्रदेश काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, आजी माजी आमदार, खासदार, सेल व विभागाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## प्रत्येक जिल्ह्यात सुरू होणार 'सुरक्षागृह', उपसभापती नीलम गोऱ्हे



**मुंबई** : आंतरजातीय आणि आंतरधर्मीय जोडप्यांना लग्नानंतर सुरुवातीच्या काळात सुरक्षित निवारा महत्वाचा असतो. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अनेकदा गंभीर होत असून अशा प्रकरणात बेदम मारहाण ते खुना पर्यंतच्या घटना घडतात. ऑनर किलिंग रोखण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात 'सुरक्षागृह' सुविधेचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

लातूर, संभाजीनगर, कोल्हापूर येथे झालेल्या ऑनर किलींगच्या घटनांचा सोमवारी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. बैठकीला महिला व बालविकास आयुक्त राहुल मोरे, संभाजीनगर विभागीय आयुक्त दिलीप गावडे, पोलिस आयुक्त प्रवीण पवार, पोलिस अधीक्षक कोल्हापूर, लातूर आयुक्त, महिला व बालविकास विभाग,आयुक्त सामाजिक न्याय विभागाचे संबंधित अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

उपसभापती गोऱ्हे म्हणाल्या की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सुरक्षा गृह (सेफ हाऊस) अंमलबजावणी करावी आणि बाबतचा सविस्तर अहवाल ३० जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावा. ऑनर किलिंगच्या घटनेमधील पीडित मुलींचे समुपदेशन व्हावे तसेच मनोधैर्य योजनेतून पीडित महिलेला काही मदत म्हणून लाभ देता येईल का पाहावे. त्यामुळे अशा मुलींना मदत होईल. तसेच या पीडित महिलांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत त्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आराखडा तयार करावा, अशा सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे सामाजिक मानहानी, कौटुंबिक त्रास आणि ऑनर किलिंगपासून संरक्षण करण्यासाठी ॲट्रॉसिटी'च्या धर्तीवर 'आंतरजातीय विवाह कायद्या'ची निर्मिती करण्यासाठी समिती गठीत केली होती. या समितीचे पुनर्गठन करावे. आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला सुरक्षेसाठीच्या हेल्पलाइन आणि विविध समित्यांची राज्यस्तरीय प्रचार प्रसिद्धी करावी, ज्यामुळे महिलांना सुरक्षितता आणि कायदेशीर मदत वेळेत उपलब्ध होईल आणि या महिलांना कायदेशीर संरक्षण मिळेल, असेही उपसभापती गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ जानेवारी २०२५

# कुशल कम्म शैली व सम्यक जीवनमूल्यांचा संदेश पेरणारा "हा जन्म बुद्ध व्हावा" : विद्रोही कवी साहेबराव मोरे




अनिल साबळे यांचा 'हा जन्म बुद्ध व्हावा ',हा गझल संग्रह समीक्षणार्थ स्नेहपूर्वक पोहचला.हातात पडता क्षणी मुखपृष्ठ व मलपृष्ठ पाहून संकर्षित झालो.

अतिदुर्लभ बुद्धांची प्रतिमा व मलपृष्ठावर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शासकीय प्रिंट छायाचित्र. राजेश वानखेडे यांचे आशयसंपन्न मुखपृष्ठ बुद्ध ज्ञानप्राप्तीपुर्व स्थीतिचे वास्तव अंकीत करणारे चित्तवेधक असे आहे .मलपृष्ठावरील ओळी परंपरेने चालत आलेल्या पाठराखण, शुभेच्छांना छेदून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या आहेत.कवीने अभ्यासपूर्ण व जाणीवपूर्वक ह्या ओळीची निवड केली आहे.

"राहिलो नाहीच आम्ही दीप घेणार्याप्रमाणे भीमराया अंतरी तू आमच्या तार्याप्रमाणे" 'स्वयं प्रकाशित व्हा' हा बुद्धांचा अखिल मानव जातीला दिलेला संदेश आंबेडकरी जनतेने प्रज्ञासूर्यांच्या तेजाने जीवनमूल्यं या अर्थी काळीज कपारीत प्रज्ज्वलित केलेला आहे संग्रहात एकूण ७१ गझलांचा समावेश असून बहुतांश गझलेशेवटी बुद्ध शिकवण देणारा शेर आलेलाआहे.एकंदर कवीला जातीयवादी परंपरेचा परकोट उद्ध्वस्त करावयचा आहे ,या अर्थी हा धम्मानुगामी व धम्माभिमानी संग्रह असल्याची अनुभूती येते. गझल हा तंत्रबद्ध काव्यप्रकार आहे.

कवितेतील हृदय म्हणजे गझल .गझलकाराचा गझलेप्रती असलेला अनूबंध मनोगतातून लक्षात येतो, गझल निर्मितीचे स्थळ, कालावधी पाहता गझलकार हा गझलेत चिंब भिजलेला आहे.सूरेश भटांनी हा काव्यप्रकार मराठीत लोकप्रिय करून मराठी भाषेला अलंकृत केले आहे आज अनेकजण गझल लिहित आहेत ,त्यात अनिल साबळे यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल, पहिलाच संग्रह असूनही त्यांनी गझल पटलावर लक्षवेधी ठसा उमटवला आहे .

"भडका उडेल जेव्हा रक्तामधून माझ्यातळपेल सूर्य दुनिये डोळ्यात अंध तुझिया"सामाजिक दंभाची झापड ओढल्या जगाला जागृत करण्यासाठी झणझणीत अंजन घालणारा हा झुंजार शब्द सैनिक आहे "पोळू नये कुणीही धर्मामध्ये मनूच्या हे कायदे भीमाचे झाले म्हणून आता"मनूसिद्धांताची बळी ठरलेली पिढी, माणूस छाटणारे, स्त्री इभ्रतीला नखं लावणारे विचार झुगारून माणूस धर्म बिंबवणार्या संविधानाची पूजक होते आहे,

बलशाली बाहु घटना रक्षणार्थ वज्रमूठ होताहेत "हा जन्म बुद्ध व्हावा" शीर्षक असलेल्या गझलेची ही शेवटची ओळ "दु:खात आस ज्याला हा जन्म बुद्ध व्हावा त्याला यशोधरेचे धुंडाळतील डोळे "दु:खाचे मूळ शोधार्थ निघालेल्या राजपुत्र सिद्धार्थाकडे यशोधरेचे डोळे आसुसलेच राहिलेत. आसक्ती हे दु:खाचे मूळ हे अंतिम सत्य ताकदीने शब्दांकित केले आहे "कोणते स्वातंत्र्य देशाला मिळाले ?हा कवीचा विमनस्क सवाल ढसाळ यांच्या उद्विग्नतेशी साधर्म्य असणाराआहे.स्वातंत्र्दीनी वर तिरंगा फडफडतो, खाली सामान्य माणूस मूलभूत गरजांअभावी तडफडतो , ही सल 'वर तिरंगा 'त मार्मिकपणे व्यक्त केली आहे."वर तिरंगा आणि माझी राख खाली,आग स्वातंत्र्या तुझी प्रत्येक साली" मानवी सहवेदना , दैनंदिन जीवनातील टोकदार प्रश्न कवीमनाला कासावीस करीत असतात, या पुष्ठ्यर्थ मोजके प्रश्न उद्धृत करीत आहे मंदिरी ज्ञानेश्वरा नाहीच का चोख्यास नेले?

कोणते असल्या अजिंठयासारखे घरदार आता?काळीज ते तुझे की बोधीच झाड होते?बुद्ध तुझिया आतला का तूच सांभाळीत नाही?सांग आई आटली तू की दुधाचा दगड झाला?बंदुका तुटल्यावरी मी कोणता भाला चिरावा?अन्याय, अत्याचार, शोषित आक्रंदन, बलात्कारीतेच्या किंचाळ्या मांडणार्या प्रश्नांच मोहोळ लोकशाही मूल्यांना विखारी डंख मारीत आहे ही खंत कवी अनिल प्रश्नांद्वारे सशक्तपणे मांडतो ही मोठी उपलब्धी म्हणावी लागेल .शब्द बाबांचा, वंदना बुद्धास माझी, लेणे, माणूस,बोधीवृक्ष,नवा सिद्धार्थ,बाबा, हा जन्म बुद्ध व्हावा, आदी गझला मानवतावादी असून कुशल कम्मशैली, सम्यक जीवनमूल्ये अंगीकृत करण्याचा आग्रह दिसून येतो.

"माझीच भाकरी का धर्मात मिळेना?गीताच सांगूणारे प्रश्न टाळून गेले""म्हणे शांततेसाठी रोज रामायणे ही ,घडे मंदिरासाठी बाबरीची कहाणी ".राख पेटली उराशी धर्म घेताना , जन्म जाळण्या कशाला जात मिणमिणते?

अशा कट्टर धर्म अभिनिवेशाच्या हृदय द्रावक गझलांतून कवी सामाजिक न्यायाचा गडद काळोख भेदण्या सज्ज रहाण्या प्रेरीत करतोय. साचलेल्या धर्म सत्तेच्या गढूळ व्यवस्थेला ढवळून काढणारे प्रश्न निर्भिडपणे विचारणारा हा कवी आहे. माणसावर प्रेम करणाराच जगी बुद्ध होतो"बुद्ध धम्माचा पहाणा तू जरा चाळून रात्री", माणूस पेरणारा प्रेषिताचा हा धम्म आहे .क्रांतीसूर्याच्या शब्दांगारातील क्रांति फुले वेचणारा हा कवी आहे आपल्या गझल लेखनातून परिवर्तनाची मशाल पेटवून सम्यक क्रांति पर्व निर्माण करण्यासाठी धडपडणाऱ्या जातकुळीचा हा भीम योद्धा आहे.जीवनाभवातील अनेक प्रसंग, प्रश्न, व्यथा वेदना भावनिक अनुबंधात बंदिस्त करणार्या गझलांमध्ये शाब्दिक अलंकार, हृदय स्पर्शी प्रतिमा, परंपरेच्या रोधात तेजाळलेली प्रतिभा, अल्पाक्षरी शब्द माधुर्य यांचा मनोहारी मिलाप रसिकांना मंत्रमुग्ध करतो

म्हणूनच अनिल साबळे यांच्या गझलांचा सुरेश वाडकर ते वैशाली माडे सारख्या प्रतिथयश गायक-गायिका स्वर झालेत. ही गौरवाची बाब आहे.

हरिती प्रकाशनाने सुबक मुद्रीत केलेला वाचनीय व देखणा संग्रह वाचकांसमोर ठेवला आहे मानवी मूल्यांची जोपासना करणार्या गझल संग्रहाचे वाचक जिज्ञासू रसिक, अभ्यासक, व परिवर्तन चळवळीच्या कार्यकर्त्यांनी आवर्जून स्वागत करावे ही अभिलाषा व्यक्त करतो.प्रा अनिल साबळे यांच्या कुशल साहित्यिक वाटचालीसाठी मंगलमय शभेच्छा!!!



**समीक्षक:**
**विद्रोही कवी साहेबराव मोरे**
मो:9404048601
हा जन्म बुद्ध व्हावा: गझल संग्रह
गझलकार: अनिल साबळे
प्रकाशन:हरिती पब्लिकेशन, पुणे
मुल्य:150 रू